**मंत्रिमंडळ निर्णय**
**२४ मे २०१६**
**( बैठक क्र. ८५ )**

| अ.क्र. | विषय | विभाग |
|---|---|---|
| १ | जास्तीत जास्त तरुणांना मुद्रा बँक योजनेचा लाभ देणार **प्रचार, प्रसार व समन्वयासाठी जिल्हास्तरीय समिती** | **नियोजन** |
| २ | कृष्णा पाणी तंटा लवादाचे मुख्य अभियंता व सह सचिव पदाची दर्जोन्नती **केंद्र शासनाशी संबंधित प्रकल्प जलद गतीने मार्गी लागण्यासाठी सचिव पदाची निर्मिती** | **जलसंपदा** |
| ३ | **आदिवासी अनुदानित आश्रमशाळांतील पहारेकऱ्यांच्या मानधनात वाढ** | **आदिवासी** |
| ४ | **एकात्मिक नगर वसाहत प्रकल्पांच्या विकासासाठी विनियमात सुधारणा** | **नगर विकास** |

**बातमी-**

१. राज्यात केवळ १२ टक्के पाणीसाठा शिल्लक, बारा हजार गावे-वाड्यांना टँकरने पाणीपुरवठा

नियोजन विभाग

जास्तीत जास्त तरुणांना मुद्रा बँक योजनेचा लाभ देणार

**प्रचार, प्रसार व समन्वयासाठी जिल्हास्तरीय समिती**

मुद्रा बँक योजनेचा लाभ जास्तीत जास्त तरुणांपर्यंत पोहोचवण्यासाठी तसेच या योजनेचा ग्रामीण व दुर्गम भागात प्रभावी प्रचार, प्रसार व समन्वयासाठी जिल्हा स्तरावर जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

यशस्वी उद्योजक होण्याचे स्वप्न उराशी बाळगणाऱ्या राज्यातील तरुणांना स्वत:चा व्यवसाय उभारण्यासाठी आर्थिक सहाय्य तसेच देशांतर्गत रोजगाराच्या संधी उपलब्ध होण्यासाठी केंद्र सरकारकडून एप्रिल महिन्यात मुद्रा बँक योजना कार्यान्वित करण्यात आली. या योजनेनुसार शिशु, किशोर व तरुण या तीन गटांतर्गत उद्योग उभारणीसाठी कुठल्याही प्रकारच्या तारणाशिवाय १० हजार ते १० लक्ष रुपयांपर्यंत कर्ज पुरवठा करण्यात येतो. या योजनेंतर्गत संबंधित व्यक्तींना जिल्हा सहकारी बँक, राष्ट्रीय बँक, प्रादेशिक ग्रामीण बँक, बिगर बँक वित्तीय संस्था इत्यादींमार्फत कर्ज देणे अपेक्षित आहे.

मुद्रा बँक योजनेचा ग्रामीण, दुर्गम भागात प्रभावीपणे प्रचार, प्रसार करण्यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्हा स्तरावर जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली ११ सदस्यीय मुद्रा बँक योजना समन्वय समिती स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. या समितीमध्ये जिल्हा उद्योग अधिकारी, औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे उपसंचालक, जिल्हा कौशल्य विकास-रोजगार व उद्योजकता विभागाचे सहायक संचालक यांच्यासह ४ क्षेत्रातील तज्ज्ञ अशासकीय सदस्य तर १ विशेष निमंत्रित यांचा समावेश असेल. तसेच जिल्हा माहिती अधिकारी हे या समितीचे सदस्य सचिव राहणार आहेत. या योजनेसाठी २०१६-१७ या आर्थिक वर्षात २० कोटी खर्च करण्यात येणार आहे.

मुद्रा योजनेचा तरुणांमध्ये प्रचार, प्रसार करण्यासह जिल्हा स्तरावर कर्ज वाटपाच्या उद्दिष्टाप्रमाणे लक्ष्यपूर्तीसाठी संनियत्रण तसेच संबंधित यंत्रणांशी समन्वय साधण्याचे कार्य देखील ही समन्वय समिती करेल. प्रत्येक गावामध्ये उद्योजक निर्माण होण्यासाठी व्यावसायिक मेळावे, कार्यशाळा, प्रशिक्षण चर्चासत्रांचे आयोजन, तरुण उद्योजकांना मार्गदर्शन आणि तांत्रिक सल्ला तसेच कौशल्य विकासाला चालना देणाऱ्या कार्यक्रमांचे आयोजन या समितीमार्फत करण्यात येणार आहे.

------o------

जलसंपदा विभाग

कृष्णा पाणी तंटा लवादाचे मुख्य अभियंता व सह सचिव पदाची दर्जोन्नती

**केंद्र शासनाशी संबंधित प्रकल्प जलद गतीने**
**मार्गी लागण्यासाठी सचिव पदाची निर्मिती**

जलसंपदा विभागातील केंद्र शासनाशी संबंधित विषय प्रभावीपणे मांडण्यासह त्यांच्या पाठपुराव्यामध्ये सातत्य राहण्यासाठी मुख्य अभियंता (स्थापत्य) संवर्गातील मुख्य अभियंता व सह सचिव (कृष्णा पाणी तंटा लवाद) हे पद दर्जोन्नत करून सचिव पद निर्माण करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

पर्यावरण मान्यता, वन प्रस्ताव, केंद्रीय जल आयोग मान्यता तसेच एआयबीपी किंवा आरआरआर सारख्या केंद्र पुरस्कृत योजनांतून केंद्रीय अर्थसहाय्य मिळविणे, नदी जोड प्रकल्प, पाणी विषयक लवाद आदी विषयांबाबत केंद्र शासनाच्या विविध विभागांशी राज्य शासनाला समन्वय ठेवावा लागतो. जलसंपदा विभागाचे प्रधान सचिव आणि लाभक्षेत्र विकासच्या सचिवांना विविध विभागांचे दैनंदिन काम हाताळताना दिल्ली येथे केंद्र शासनाने बोलाविलेल्या बैठकांना उपस्थित राहणे बऱ्याच वेळा शक्य होत नाही. त्यामुळे संबंधित पदावर जाणकार अधिकाऱ्याची नियुक्ती करणे आवश्यक असल्याने त्यास सचिव पदाचा दर्जा देण्यात आला आहे. यामुळे राज्यातील विविध प्रकल्प जलद गतीने मार्गी लागणे शक्य होणार आहे.

------o------

आदिवासी विकास विभाग

**आदिवासी अनुदानित आश्रमशाळांतील**
**पहारेकऱ्यांच्या मानधनात वाढ**

राज्यातील आदिवासी अनुदानित आश्रमशाळांतील पहारेकऱ्यांचे मानधन ३२०० रूपयांवरून ५००० करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. त्याचा लाभ राज्यातील ५५६ पहारेकऱ्यांना होणार आहे.

आदिवासी विकास विभागांतर्गत राज्यात ५५६ अनुदानित आश्रमशाळा चालविण्यात येतात. या आश्रमशाळेत सुरक्षेच्या दृष्टीने पहारेकरी किंवा सुरक्षारक्षकाची पदे शासनमान्य सुरक्षा मंडळे किंवा खासगी सुरक्षा मंडळांकडून भरण्यास शासनाने मान्यता दिली होती. परंतु या आश्रमशाळेतील सुरक्षा रक्षकांना तुलनेने कमी मानधन मिळत असल्याने प्रशिक्षित सुरक्षा रक्षक उपलब्ध होण्यास अडचणी येत होत्या. त्यामुळे सामाजिक न्याय विभागाच्या अधिपत्याखालील अनुदानित मागासवर्ग वसतिगृहातील चौकीदारांप्रमाणे ५००० रूपये मानधन देण्याचा निर्णय घेण्यात आला. याचा लाभ राज्यातील ५५६ पहारेकऱ्यांना होणार असून त्यासाठी वार्षिक १.२० कोटी रूपयांच्या वाढीव आवर्ती खर्चास मान्यता देण्यात आली आहे. पहारेकरी पदांची नियुक्ती यापुढे अनुदानित आश्रमशाळेच्या संस्थाचालकांकडून सुरक्षारक्षकाचे विहित प्रशिक्षण घेतल्याचे सक्षम संस्थेचे प्रमाणपत्र प्राप्त उमेदवारांमधून करण्यात येणार आहे.

------o------

नगर विकास विभाग

## एकात्मिक नगर वसाहत प्रकल्पांच्या विकासासाठी विनियमात सुधारणा

राज्यात स्मार्ट सिटीसारख्या समृद्ध नगर वसाहत प्रकल्पांच्या माध्यमातून उच्च दर्जाच्या नागरी पायाभूत सेवा-सुविधा, स्वच्छ व शाश्वत पर्यावरण, आर्थिक दुर्बल व कमी उत्पन्न गटांसाठी परवडणारी घरे, निवासी वापरासाठी जास्तीत जास्त जागेची उपलब्धता आदी उद्देशांसाठी सध्याच्या विशेष नगर वसाहतींच्या विनियमात सुधारणा करण्याचा निर्णय मंत्रिमंडळाच्या आजच्या बैठकीत घेण्यात आला. या सुधारणांमुळे जास्तीत जास्त सदनिकांच्या उपलब्धतेसाठी वाढीव चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय होणार असून सन २०२२ पर्यंत सर्वांना घरे हे उद्दिष्ट साध्य करण्यासही मदत होणार आहे. तसेच यामुळे प्रमाणकांचे नियोजन आणि नियमांमध्ये स्पष्टता व सुटसुटीतपणा येणार आहे.

या निर्णयामुळे स्मार्ट सिटीसारख्या समृद्ध वसाहती निर्माण करण्यासाठी शासनास कोणताही खर्च करावा लागणार नाही. मात्र, राज्यातील सर्व प्रादेशिक योजना, क्षेत्र विकास प्राधिकरण आणि विशेष नियोजन प्राधिकरणांच्या सध्याच्या विशेष नगर वसाहतीचे विद्यमान विनियम सुधारित होणार आहेत. ज्या क्षेत्रासाठी प्रादेशिक योजना मंजूर नाहीत अशा क्षेत्रामध्ये नगर वसाहत निर्माण करण्यासाठी विकास नियंत्रित नियमावलीतही बदल करण्यात येणार आहे.

खासगी गुंतवणुकीस प्रोत्साहन देणे, किफायतशीर दरात घरांची उपलब्धता करणे, गुंतवणूकदारांसाठी पोषक वातावरण निर्माण करण्यासाठी विशेष नगर वसाहत योजना सन २००४ मध्ये तयार करण्यात आली होती. मात्र, २००५ ते २०१५ या कालावधीत या योजनेतून अवघे १७ प्रकल्प कार्यान्वित झाले. त्यामुळे सर्वसामान्यांना किफायतशीर दरात घरांची उपलब्धता होण्यासाठी आणि ही योजना लोकाभिमुख करण्यासाठी योजनेच्या विनियमांत सुधारणा आवश्यक होती.

नव्या सुधारीत विनियमानुसार प्रकल्पाचे क्षेत्र सलग ४० हेक्टर असावे, त्यास अस्तित्वातील अथवा प्रस्तावित २४ मी. रूंदीचा रस्ता असावा. विशेष नगर वसाहतीला परवानगी देताना रहिवास विभागातील आणि शेती विभागातील असे दोन प्रकार ठरविण्याऐवजी रहिवास विभागातील एकच प्रकार ठरविण्यात आला असून चटई क्षेत्र निर्देशांकासाठी एकच नियम ठेवण्यात आला आहे. प्रकल्पांमध्ये जास्तीत जास्त बांधीव क्षेत्र उपलब्ध होण्यासाठी मूळ चटई क्षेत्र निर्देशांकावर अधिमुल्य आकारून अतिरिक्त १०० टक्क्यांपर्यंत चटई क्षेत्र निर्देशांक मंजूर करण्यास मान्यता देण्यात आली आहे. यामुळे नागरिकांना जास्तीत जास्त सदनिका उपलब्ध होऊ शकणार आहेत. परिणामी परवडणाऱ्या अधिक घरांचे उद्दिष्ट साधण्यास मदत होणार आहे.

खुल्या जागा, बागबगिचे त्याचप्रमाणे सार्वजनिक सुविधांसाठी किमान जागा ठेवावी व त्यामध्ये किमान बांधकाम क्षेत्र किती असावे याबाबतीतही विनियमात सुधारणा करण्यात आली आहे. विशेष म्हणजे निवासी बांधकाम क्षेत्राच्या किमान ६० टक्के बांधकाम क्षेत्र ही तरतूद कायम असली तरी आर्थिकदृष्ट्या दुर्बल व अल्प उत्पन्न गटासाठी योग्य व आवश्यक त्या प्रमाणात सदनिका उपलब्ध व्हाव्यात यासाठी ३० व ५० चौरस मीटर कमाल बांधकाम क्षेत्राच्या सदनिका बांधणे बंधनकारक करण्यात आले आहे.

-----०-----

## राज्यातील पाणी परिस्थिती

जलसंपदा/पाणी पुरवठा/रोहयो/कृषी

### राज्यात केवळ १२ टक्के पाणीसाठा शिल्लक,
### बारा हजार गावे-वाड्यांना टँकरने पाणीपुरवठा

राज्याच्या जलाशयातील एकूण उपयुक्त साठा केवळ १२ टक्के इतका शिल्लक असून पाणी टंचाईने भेडसावणाऱ्या ४६०० गावे आणि ७४१८ वाड्यांना ५७३८ टँकरच्या माध्यमातून पाणी पुरवठा करण्यात येत आहे.

**धरणात १२ टक्के पाणी साठा**

राज्याच्या जलाशयातील सर्व प्रकल्पांत केवळ १२ टक्के साठा असून गेल्या वर्षी याच सुमारास २२ टक्के पाणी साठा होता. जलाशयातील विभागनिहाय सध्याचा आणि कंसात गतवर्षीचा साठा पुढीलप्रमाणे- (ही आकडेवारी दि. २० मे रोजीची आहे)

मराठवाडा-१ टक्के (८), कोकण-३६ टक्के (३७), नागपूर-२१ टक्के (२३), अमरावती-१३ टक्के (२६), नाशिक-१२ टक्के (२४) आणि पुणे-१० टक्के (२४).

**बारा हजार गावे-वाड्यांना टँकरने पाणी पुरवठा**

राज्यातील ४६०० गावे आणि ७४१८ वाड्यांना दि. २३ मे २०१६ पर्यंत ५७३८ टँकर्सद्वारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यात येत आहे. मागील वर्षी याच सुमारास १९९८ गावे आणि २६०७ वाड्यांना २३५८ टँकर्सद्वारे पाणी पुरवठा करण्यात येत होता.

**रोहयोच्या कामावर साडेसहा लाख मजूर**

महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत राज्यात मे १४ पर्यंत ३९ हजार ४७४ कामे सुरू असून या कामांवर सहा लाख ५२ हजार ३९० मजुरांची उपस्थिती आहे. राज्यात ४ लाख १६ हजार ८८३ कामे शेल्फवर असून त्या कामांची मजूर क्षमता १२४७.३४ लाख एवढी आहे.

**राज्यात ३९८ चारा छावण्या**

राज्यात बीड, लातूर, उस्मानाबाद आणि अहमदनगर या जिल्ह्यांसाठी ४२६ चारा छावण्या मंजूर करण्यात आल्या असून त्यातील ३९८ चारा छावण्या सुरु झाल्या आहेत. मे २० अखेरपर्यंत बीड २७२, उस्मानाबाद ८९, अहमदनगर ३१, लातूर ६ याप्रमाणे एकूण ३९८ चारा छावण्या सुरु आहेत. त्यात लहान मोठी अशी एकूण ४ लाख २४ हजार ३७९ जनावरे आहेत.

**खते व बियाण्यांची पुरेसी उपलब्धता**

राज्यात खरीप हंगाम-२०१६ साठी ४३.७५ लाख मे.टन खतांची मागणी असून ४०.२५ लाख मे.टन एवढ्या खतांचे नियोजन करण्यात आले आहे. याशिवाय केंद्र शासनाने राज्यासाठी युरिया खताचे एकूण ०.५० लाख मे.टन वाढीव राखीव आवंटन मंजूर केले आहे. खरीप-२०१५ मधील खत वापराच्या तुलनेत यावेळच्या मागणीचे प्रमाण २६ टक्क्यांनी जास्त आहे.

खरीप-२०१६ साठी हंगामातील अपेक्षित क्षेत्र, मागील तीन वर्षाची सरासरी विक्री आणि बियाणे बदल दर यानुसार पिकनिहाय बियाण्याची गरज निश्चित करण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे सार्वजनिक व खाजगी क्षेत्राकडे उपलब्ध असणाऱ्या बियाण्याची माहिती घेऊन नियोजन करण्यात आले आहे. खरीप हंगामासाठी १४.९९ लाख क्विंटल बियाण्यांची गरज असून त्या तुलनेत १७.९० लाख क्विंटल बियाण्यांची उपलब्धता आहे.

-----०-----